# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ४६ / २०२३

गावठाण फिडरवरुन वाणिज्यिक वीज वापरासाठी वीज पुरवठा मिळण्याबाबत

मोहन राजाराम सुतार (वापरकर्ता) ........................................................................................ अपिलार्थी
(ग्राहक क्रमांक ३४०४४०६५२९५१
राजाराम मारुती सुतार)

विरुध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, पंढरपूर (महावितरण) .......................................................... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- संतोष सुतार

प्रतिवादीतर्फे :- १) विजय पाटील, कार्यकारी अभियंता, पंढरपूर
२) गणेश पवार, उपकार्यकारी अभियंता
३) बाळकृष्ण खरात, सहाय्यक अभियंता

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)
सुनावणी तारीख :- १ ऑगष्ट २०२३
आदेश पारित दिनांक :- ३ ऑगष्ट २०२३

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, बारामती परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक ११ जानेवारी २०२३ च्या आदेशाविरुध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २१ एप्रिल २०२३ रोजी दाखल केले.

२.	मंचाने तक्रारदार यांचे गाऱ्हाणे (क्रमांक ३६/२०२२) दिनांक ११ जानेवारी २०२३ रोजीच्या आदेशान्वये तक्रार अंशतः मंजूर करुन ग्राहकाची विद्युत कनेक्शन वर्गवारी वाणिज्य असुन त्यांना नियमित वीज पुरवठा करणे याबाबत ६० दिवसांमध्ये कार्यवाही करण्यात यावी असे निर्देश दिले.

३.	अपिलार्थीच्या निवेदनातील प्रमुख मुद्दे व दिनांक १ ऑगष्ट २०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीतील महत्वाचे मुद्दे एकत्रितरीत्या खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थी यांच्या मयत वडीलांच्या नावें मौजे खवासपूर, तालूका सांगोला येथे घर क्रमांक ७२६/अ मध्ये घरगुती वीज जोडणी (ग्राहक क्रमांक ३४०४४०६५२९५१) आहे व ती पूर्वी गावठाण फिडरवरील ६३ केव्हीए रोहीत्रावरुन देण्यात आली होती. त्यामुळे अपिलार्थीस २४ तास वीज पुरवठा मिळत होता व त्याच्या वीज जोडणीच्या वीज देयकांचा अपिलार्थी वेळोवेळी भरणा करीत होते.

- दिनांक ५ मार्च २०१९ रोजी वादळी वाऱ्यामुळे वीज खांबा वरील तारा तुटल्यामुळे अपिलार्थीचा वीज पुरवठा खंडीत झाला. त्यानंतर दिनांक ६ मार्च २०१९ रोजी गावचे वायरमन तारा जोडण्यासाठी आले असता त्यास स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केला. त्यावर वायरमनने अपिलार्थी यांचा वीज पुरवठा पूर्वीच्या गावठाण फिडरवरील ६३ केव्हीए रोहीत्राऐवजी खंडोबा मंदीर येथील लोडशेडींग असणाऱ्या कृषी पंपाच्या फिडर रोहीत्रावरुन दिला. त्यामुळे लोडशेडींग, लो व्होल्टेज, कृषी पंपाच्या फिडरवरील भारनियमनामुळे आठवडयाने बदलणारे वेळापत्रक यासारखा त्रास अपिलार्थीस सहन करावा लागत आहे.

- याबाबत अपिलार्थींनी दिनांक १८ डिसेंबर २०१९ रोजी लेखी तक्रार दिली असता त्यावर कोणतीही कार्यवाही प्रतिवादींनी केली नाही. तदनंतर अपिलार्थींनी नवीन व्यवसाय करण्याच्या उद्देशाने पिठाच्या गिरणीसाठी व वेल्डींगच्या व्यवसायासाठी २४ तास उपलब्ध असणाऱ्या ६३ केव्हीए रोहीत्रावरुन ३ एचपी वीज जोडणीसाठी अर्ज केला. परंतू प्रतिवादींनी वीज जोडणी गावठाण फिडरवरील ६३ केव्हीए रोहीत्राऐवजी (जाणीव पूर्वक) लोड शिल्लक नाही, असे, कारण सांगून फक्त ८ तास ३ फेज पॉवर उपलब्ध असणाऱ्या रोहीत्रावरुन मंजूर केली.

- सदर वीज जोडणी भारनियमनामुळे व्यवसायासाठी उपयुक्त नसल्याने अपिलार्थीने वीज जोडणी करण्यास तोंडी विरोध केला. पण अपिलार्थी हे घरात नसताना प्रतिवादींनी अपिलार्थीच्या वीज जोडणीचा मीटर परस्पर बसवुन गेले.

विद्युत लोकपाल मुंबई म.वि.नि.आ.

- अपिलार्थींची वीज जोडणी वाणिज्य असतानाही कृषी पंप फिडरवर असणाऱ्या भारनियमनामुळे अपिलार्थीस २४ तास अखंडीत वीज पुरवठा मिळत नाही. परंतू वीज देयके मात्र ३ एचपी आकाराने भरणा करावी लागत आहेत. दरम्यानच्या काळात गावठाण फिडरवरील ६३ केव्हीए रोहीत्रावरून इतर अनेक वीज ग्राहकांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत याची नोंद घेण्यात यावी.

- प्रतिवादीच्या उत्तरामध्ये तार हटवण्याचे काम ८ वर्षापूर्वी केल्याचे नमुद केले आहे. पण प्रत्यक्षात सदर काम दिनांक ६ मार्च २०१९ रोजी केलेले आहे.

- अपिलार्थीने नमुद केले की, इतर ग्राहकांची वीज जोडणी कृषी पंपाच्या फिडरवरील ६३ केव्हीए रोहीत्रावरून असतानाही ते गावठाण फिडरवरील रोहित्रावरील पोल नंबर २ वरून आकडा टाकून वीज चोरी करत आहेत, त्यांच्यावर मात्र अद्यापही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. अपिलार्थीने व्यवसायासाठी कर्ज घेतलेले आहे व भारनियमनामुळे व्यवसाय चालत नाही; त्यामुळे अपिलार्थीस कर्जाचे हफ्ते व व्याजाचा भरणा करण्यास अवघड जात आहे. वीज जोडणीसाठीचे कोटेशन रु.१०४२८/- आणि माहे ऑगष्ट २०२० ते मे २०२२ या कालावधीच्या वीज देयकाचा एकुण रु.२१६५६.७९ चा भरणा केलेला आहे.

- अपिलार्थीने दिनांक २३ ऑगष्ट २०२२ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली असता मंचाने वाणिज्य वर्गवारीमध्ये नियमित वीज पुरवठा देण्याचे आदेश दिले. मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही म्हणून अपिलार्थीने दिनांक २१ एप्रिल २०२३ रोजी माननीय विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्याकडे तक्रार दाखल केली.
    - अपिलार्थीने शारीरिक व मानसिक त्रासापोटी रु.१०,००,०००/-, व्यवसायात झालेल्या नुकसानीपोटी रु.७०,००,०००/- लाख व तक्रार अर्जासाठी झालेला खर्च म्हणून २५००/- ची मागणी केली आहे.

४. प्रतिवादींच्या दिनांक २७ जुलै २०२३ रोजीच्या उत्तरातील प्रमुख मुद्दे व दिनांक १ ऑगष्ट २०२३ रोजी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीतील महत्वाचे मुद्दे एकत्रितरीत्या खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थी यांच्या मयत वडीलांच्या नावावर मौजे खवासपूर, तालूका सांगोला येथे घर क्रमांक ७२६/अ मध्ये घरगुती वीज जोडणी (ग्राहक क्रमांक ३४०४४०६५२९५१) आहे. सदर वीज जोडणी ही कृषीपंप रोहीत्र लघुदाब वाहिणीवरून दिलेली आहे.



विद्युत लोकपाल मुंबई म.वि.नि.आ.

- अपिलार्थीने दिनांक २१ नोव्हेंबर २०१९ रोजी पिठाच्या गिरणीसाठी व वेल्डींगच्या व्यवसायासाठी ३ एचपी भार व्यावसायिक वीज जोडणीसाठी अर्ज केला. अर्ज केल्यानंतर शाखाधिकारी महुद यांनी सदर अर्जाची शहानिशा करून अंदाजपत्रक बनविले, सदर अंदाजपत्रक तयार करताना अपिलार्थीस गावठाण फिडर रोहीत्रावरून वीज जोडणी द्यायची झाल्यास गावठाण फिडर ते वीज जोडणी देण्याची जागा येतील अंतर ४०० फुटाचे असल्याने अधिक खर्चाचे आहे. म्हणून प्रतिवादीने कृषीपंप फिडर रोहीत्रावरून वीज जोडणी देण्यासाठीचे अंदाजपत्रक बनवून ते मंजूरीसाठी पाठवून दिले. दिनांक १८ मार्च २0२0 रोजी अपिलार्थीकडून कोटेशनची रक्कम भरून घेतली. परंतू अपिलार्थीने कृषीपंप रोहीत्रावरून वीज जोडणी घेण्यास नकार दिला.

- प्रतिवादीने अपिलार्थीस वीज जोडणी ही अंदाजपत्रकानुसार मंजूर झालेल्या कृषीपंप रोहीत्रावरून जोडून घेण्यात यावी; अन्यथा, वीज जोडणी मंजुरी रद्द करण्यात येईल, असे लेखी कळविले. त्यानंतर प्रतिवादीने अपिलार्थीची व्यावसायिक वीज जोडणी कृषीपंप फिडर रोहीत्रावरून मीटर लावून दिनांक १३ जुलै २0२0 रोजी चालू केली.

- नवीन वीज जोडणीसाठी गावठाण फिडरवरून अपिलार्थीच्या जागेपर्यंत लघुदाब वाहिनी तयार करण्यासाठी लागणाऱ्या निधीची कमतरता आहे, याची जाणीव अपिलार्थीस करून देण्यात आली. म्हणून प्रतिवादीने दिनांक १३ जुलै २0२0 रोजीच्या पत्रान्वये कळविले, की, गावठाण रोहीत्रावरून वीज जोडणी पाहिजे असल्यास १.३ डिडीएफ योजनेतून घेणे अपिलार्थीच्या फायदयाचे ठरेल, त्यानुसार अंदाजपत्रक तयार करण्यास आवश्यक ती कागदपत्रे सादर करण्याबाबत कळविले. परंतू त्यास अपिलार्थीने नकार दिला.

- २३ ऑगष्ट २०२२ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली असता मंचाने वाणिज्य वर्गवारीमध्ये नियमित वीज पुरवठा देण्याचे आदेश दिले. मंचाच्या आदेशानूसार महावितरणने सदर कामासाठी The District Planning and Development Council (डिपीडीसी) यांच्याकडे निधीची मागणी केली आहे. सदर निधीची उपलब्धता झाल्यावर विलंब न लावता वीज जोडणीचे काम पूर्ण करण्यात येईल.

- ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२० मधील विनियम २०.४ (ई) खाली नमुद केला आहे.

*"कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही ग्राहकाला अप्रत्यक्ष, परिणामी, आनुषंगित, दंडात्मक किंवा अनुकरणीय नुकसान, नफा किंवा संधी हानीचा हक्क मिळणार नाही. या कलमानुसार अर्जदाराला मागणी केलेली नुकसान भरपाई दिली जाऊ शकत नाही".*

- प्रतिवादीने निदर्शनास आणून दिले की, फक्त वाणिज्यिक ३ एचपी भार घेऊन गावठाण फिडर रोहीत्रावरील लघूदाब वीज पुरवठा अपिलार्थीच्या घरापर्यंत आणण्याचा हेतू दिसतो. प्रतिवादीने आणखी निदर्शनास आणून दिले की, शेतीचे पंप कृषी पंप फिडर ऐवजी गावठाण फिडरवर चालविण्याचे अनधिकृत प्रकार अलीकडच्या काळात निदर्शनास येत आहेत, त्याबाबत योग्य ती तपासणी करण्यात येईल.

- अपिलार्थीने जाणीवपूर्वक गावठाण फिडरवरील तारा काढुन नेल्याचे अर्जात उल्लेखलिले आहे, परंतू सदर फिडर आठ वर्षापूर्वीच काढला आहे. अपिलार्थीच्या घराजवळ असलेल्या पोलवर कृषीपंप फिडरवरील लघुदाब वाहिणी व गावठाण फिडरवरील लघुदाब वाहिणी एकत्र येऊन रिंग फिडर तयार झालेला होता. सदर रिंगफिडरच्या पोलवर कृषीपंप धारकाचे २४ तास वीज पुरवठयासाठी अनधिकृत आकडे (Tapping) पडत होते. अपिलार्थीच्या घराशेजारी ढेरे मळयाकडे जाणाऱ्या रस्त्यांवर ये जा करणाऱ्या उंच वाहनांना तारा अडकत होत्या म्हणून बाह्यस्त्रोत कर्मचारी श्री. दादासो मारुती फुले यांनी तारा काढल्या होत्या, तसा जबाबही त्यांनी नोंदविला आहे. अपिलार्थीस वीज जोडणी देताना कोणताही त्रास देण्याचा वैयक्तिक हेतू नव्हता, नाही व अपिलार्थीस पुर्णतः अवगत करूनच वीज जोडणी दिलेली आहे.

- अपिलार्थीचे गाऱ्हाणे हे कोणत्याही पुरेशा कारणाशिवायचे असून ते अधिकार क्षेत्र आणि मर्यादेशिवाय आहे, तसेच, प्रतिनिधित्व गुणवत्तेपासून वंचीत आहे. सबब, सदर गाऱ्हाणे फेटाळण्यात यावे.

**विश्लेषण व निर्णय**

५. दोन्ही पक्षकारांचे म्हणने ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

६. अपिलार्थीने दिनांक २१ नोव्हेंबर २०१९ रोजी वाणिज्यक व्यवसायासाठी ३ एचपी भाराचे वीज जोडणीसाठी अर्ज केला. प्रतिवादीने अपिलार्थीची व्यावसायिक वीज जोडणी दिनांक १३ जुलै २०२० रोजी

विद्युत लोकपाल मुंबई म.वि.नि.आ.

कृषीपंप फिडर रोहीत्रावरून मीटर लावून चालू केली. अपिलार्थीने असे नमुद केले की, त्यांची वीज जोडणी वाणिज्य वर्गवारीतील असतानाही कृषी पंप फिडरवर असणाऱ्या भारनियमामुळे २४ तास अखंडीत वीज पुरवठा मिळण्या ऐवजी फक्त ८ तासच वीज पुरवठा मिळत होता. पूर्वी अपिलार्थीच्या जागेपर्यंत गावठाण फिडरवरील रोहीत्राचा वीज पुरवठा होता, तो प्रतिवादींनी परस्पर काढला. अपिलार्थीने दिनांक २३ ऑगष्ट २०२२ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली असता, मंचाने वाणिज्य वर्गवारीमध्ये नियमित वीज पुरवठा देण्याचे आदेश दिले.

सुनावणी दरम्यान प्रतिवादींना त्याबाबत विचारले असता, दोन महिन्याच्या कालावधीत अपिलार्थींना अखंडीत वीज पुरवठा देण्यात येईल असे नमुद केले.

७. मंचाने अपिलार्थीच्या गाऱ्हाणेबाबत तर्कसंगत आदेश दिला आहे. म्हणून मंचाचा आदेश कायम ठेवण्यात येत आहे. प्रतिवादींना आदेशीत करण्यात येत आहे की, अपिलार्थींना अखंडीत वीज पुरवठा दोन महिन्यांच्या आत देण्यात यावा.

८. या आदेशाच्या दिनांकापासुन दोन महिन्यांच्या आत 'अनुपालन अहवाल' सादर करावा.

९. अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)